SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
PHONE : Director Office –( 0231)2609068 CAP Section – (0231)2609317/2609110 Website – www.unishivaji.ac.in, Email – cap@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – ४१६००४, महाराष्ट्र
दुरध्वनी : संचालक कार्यालय-०२३१ २६०९०६८ मध्यवर्ती मूल्यमापन विभाग-०२३१ २६०९३१७/२६०९११० संकेतस्थळ – www.unishivaji.ac.in, ई-मेल आयडी - cap@unishivaji.ac.in
Estd. 1962 "A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

Ref. No. SU/Exam/CAP/ 1450 Date : 06 APR 2026

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून (ऑक्टों./नोंव्हें. २०२५ या हिवाळी सत्र परीक्षेपासून) पुढील ०३ शैक्षणिक वर्षांकरीता पारंपारिक तसेच इतर काही पदवी अभ्यासक्रमांच्या भाग – १ (प्रथम वर्ष) परीक्षेच्या महाविद्यालयीन स्तरावर करण्यात येत असलेल्या उत्तरपत्रिका मूल्यमापन कामकाजाबाबत.**

**संदर्भ : या कार्यालयाचे जा.क्र./एसयु/एक्झाम/कॅप/१०९० दि.१५/१०/२०२५ रोजीचे पत्र.**

**महोदय/महोदया,**

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयास अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून (ऑक्टों./नोंव्हें. २०२५ या हिवाळी सत्र परीक्षेपासून) पुढील ०३ शैक्षणिक वर्षांकरीता पारंपारिक तसेच इतर काही पदवी अभ्यासक्रमांचे भाग – १ परीक्षांचे (प्रथम वर्ष) आयोजन व उत्तरपत्रिका मूल्यमापन कामकाज महाविद्यालयीन स्तरावर करणेबाबत आपणांस उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

**त्या अनुषंगाने ऑक्टों./नोंव्हें. २०२५ या हिवाळी सत्रातील पारंपारिक तसेच इतर काही पदवी अभ्यासक्रमांच्या (बी.ए., बी. कॉम., बी.एस्सी. (सर्व अभ्यासक्रम), बी.बी.ए., बी.सी.ए., बी.सी.एस., बी.ए.बी.एड्., बी. व्होक (सर्व विद्याशाखा)) भाग – १ परीक्षेचे वेळापत्रक व प्रश्नपत्रिका नियोजन विद्यापीठ स्तरावर करण्यात आले असून उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन महाविद्यालयीन स्तरावर करण्यात आले आहे.**

**सदर महाविद्यालयीन स्तरावर झालेल्या उत्तरपत्रिका मूल्यमापन कामकाजाचे अवलोकन केल्यानंतर खालीलप्रमाणे काही बाबी निदर्शनास आल्या आहेत.**

1. **ज्या महाविद्यालयामध्ये विद्यापीठ मान्यताप्राप्त/पात्र शिक्षक उपलब्ध नाहीत अशा महाविद्यालयांनी आपल्याच महाविद्यालयातील अन्य शिक्षकांकडून मूल्यमापन केल्याचे निदर्शनास आले आहे.**
2. **ज्या महाविद्यालयात एखादा अभ्यासक्रम/विषय विनाअनुदानित तत्वावर आहे, अशा अभ्यासक्रमांच्या/विषयांच्या उत्तरपत्रिका मान्यताप्राप्त/पात्र पात्र शिक्षकांकडून तपासून घेण्यात आलेल्या नाहीत.**

उपरोक्त बाबी परीक्षा विषयक गोपनियतेचा विचार करता अतिशय गंभीर स्वरूपाच्या आहेत. तेंव्हा येथून पुढे उपरोक्त अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष परीक्षेच्या उत्तरपत्रिका महाविद्यालय स्तरावर मूल्यमापन करताना खालील बाबींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

1. प्रथम वर्ष परीक्षेच्या उत्तरपत्रिका महाविद्यालयातील विद्यापीठ मान्यताप्राप्त/पात्र शिक्षकांकडूनच मूल्यांकन करून घ्याव्यात. जर एखाद्या अभ्यासक्रमास अथवा विषयास विद्यापीठ मान्यताप्राप्त/पात्र शिक्षक उपलब्ध नसतील तर नजिकच्या महाविद्यालयातील विद्यापीठ मान्यताप्राप्त/पात्र शिक्षकांकडून उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन करून घेण्यात यावे.
2. ज्या अनुदानीत महाविद्यालयात एखादा अभ्यासक्रम/विषय विनाअनुदानीत तत्वावर आहे, तथापि सदर अभ्यासक्रम/विषयास मान्यताप्राप्त/पात्र शिक्षक उपलब्ध नाहीत अशा अभ्यासक्रमांच्या/विषयांच्या उत्तरपत्रिका सुध्दा नजिकच्या अनुदानीत महाविद्यालयातील विद्यापीठ मान्यताप्राप्त/पात्र शिक्षकांकडून तपासून घेण्यात याव्यात.
3. सदर महाविद्यालय स्तरावर उत्तरपत्रिका मूल्यमापन कामकाज करताना उपरोक्त संदर्भीय पत्रासोबत पाठविण्यात आलेल्या विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्य केलेल्या कार्यपध्दतीतील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

विद्यापीठ अधिकार मंडळांनी घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार सदर प्रती सत्र महाविद्यालयीन स्तरावर होणा-या मूल्यमापन कामकाजाची आवश्यकतेनुसार पडताळणी समितीमार्फत पडताळणी करण्यात येणार आहे. तेंव्हा ज्या-ज्या वेळी पडताळणी समिती महाविद्यालयास पडताळणी करण्यासाठी भेट देईल त्या-त्या वेळी समितीस आवश्यक सर्व कागदपत्रे उपलब्ध करून देवून सहकार्य करावे.

जर एखाद्या महाविद्यालयाकडून उपरोक्त बाबींचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास सदर महाविद्यालयांच्या अनुषंगाने आवश्यकतेनुसार प्रकरण परीक्षा प्रमाद समिती समोर सादर करण्यात येईल व त्यावर होणा-या निर्णयानुसार संबंधित महाविद्यालयांवर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

सोबत :- पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष परीक्षेच्या उत्तरपत्रिका महाविद्यालय स्तरावर मूल्यमापनाबाबतची कार्यपध्दती

प्रत :-

1. मा. कुलगुरू कार्यालय
2. मा. प्र-कुलगुरू कार्यालय
3. मा. कुलसचिव कार्यालय
4. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ कार्यालय
5. परीक्षा विभागातील सर्व प्रशासकीय अधिकारी व सर्व परीक्षा विभाग
6. आय.टी. सेल विभागास
7. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
8. इंटरनेट विभागास सदरचे पत्र विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी